# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of Illegal Property**

**Police Station** :- **WashimCity**

**Date of Good Work done** :- **07/02/2022**

**Brief of the work done :-**

पोलीस अधीक्षक श्री बच्चन सिंह यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पो नि सोमनाथ जाधव व त्यांच्या पथकाने वाशिम शहरांमध्ये अवैधरित्या बायोडिझेल आणलेला असून सदर माहितीवरून बायो डिझेलचा 16 लाख रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे

लोकमत

# जिल्ह्यात प्रथमच औद्योगिक इंधनाचा साठा जप्त!

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाशिम** : बायो डिझेलच्या नावाने औद्योगिक इंधनाची विक्री (इंडस्ट्रियल ऑईल) करण्याचा गोरखधंदा पोलिसांनी उघडकीस आणला आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ४ फेब्रुवारी रोजी वाशिम ते केकतउमरा या मार्गावरील गोटे महाविद्यालयासमोरील एका टीनशेड मध्ये औद्योगिक इंधन, वाहन असा १५.१४ लाखांचा मुद्देमाल जप्त केला.

पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांनी जिल्ह्याचा पदभार स्वीकारल्यापासून गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा बसावा याकरिता जिल्ह्यात वेळोवेळी नाकाबंदी, कोम्बिंग मोहीम राबवून अवैध धंद्यांवर कारवाई, मालमत्तेच्या गुन्ह्यातील आरोपींवर प्रतिबंधात्मक कारवाईचा बडगा उगारला आहे. बायो डिझेलच्या नावाने औद्योगिक इंधनाची विक्री होत असल्याची माहिती पोलीस अधीक्षक सिंह यांना मिळाल्याने तातडीने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सोमनाथ जाधव यांना खात्री करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने घटनास्थळी धाव घेत पाहणी केली असता, एका टीनशेड मध्ये एमएच २८ - बीबी ४१३१ क्रमांकाच्या वाहनातून औद्योगिक इंधन या नावाने बायोडिझेल बेकायदेशीररीत्या इलेक्ट्रिक पाण्याची मोटार व पाईप लावून टीनशेडमधील प्लास्टिक टाकीमध्ये उतरवित असताना आढळून आले. घटनास्थळी नमूद ७ इसमांना पंचासमक्ष ताब्यात घेऊन विचारपूस केली असता, त्यांच्याकडे औद्योगिक इंधन विक्री व साठवणूक करण्याबाबतचा कोणताही परवाना नसल्याचे सांगितले. आरोपींकडून अंदाजे सहा हजार लिटर औद्योगिक इंधनाचा साठा, एक टाटा वाहन व इतर साहित्य, असा एकूण १५ लाख १४ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला.



## पुढील कारवाईसाठी तहसीलदारांना पत्र

औद्योगिक इंधनाचा साठा जप्त करून पुढील कायदेशीर कारवाईसाठी पोलीस विभागाने वाशिम तहसिलदार व पुरवठा निरिक्षक यांना लेखी पत्राद्वारे कळविण्यात आले.

## यांनी बजावली कामगिरी

पोलीस अधिक्षक बच्चन सिंह, अपर पोलीस अधिक्षक गोरख भामरे यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक सोमनाथ जाधव, सहायक पोलीस निरीक्षक प्रमोद इंगळे, पोलीस उपनिरीक्षक पठाण यांच्यासह पोलीस कर्मचारी किशोर चिचोळकर, राजेश गिरी, अमोल इंगोले, प्रशांत राजगुरु, संतोष शेणकुडे यांनी कारवाई केली.

Hello Washim
Page No. 1 Feb 07, 2022
Powered by: erelego.com